VOL- VIII ISSUE- V MAY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# नंदूरबार जिल्ह्यातील आदिवासी जमातीचे निसर्गपूजक सण-उत्सव

दिपक कोलू वळवी,
अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय,
वसई(प.),पालघर

**प्रस्तावना-**

भारतातील महाराष्ट्र राज्याच्या उत्तरेकडील खान्देश विभागात नंदूरबार हा आदिवासीबहुल जिल्हा असून निसर्गाच्या वैविध्याने परिपूर्ण आहे. आदिवासींची धुळे जिल्ह्यातील लोकसंख्या जास्त असल्याकारणाने स्वतंत्र आदिवासी जिल्ह्याची मागणी जोर धरू लागल्यानंतर धुळे जिल्ह्याचे १ जुलै १९९८ रोजी विभाजन करण्यात येऊन नंदूरबार जिल्हा अस्तित्वात आला. नंदूरबार जिल्ह्याचे क्षेत्रफळ ५०५५ कि.मीर इतके आहे. नंदूरबार जिल्ह्याला दोन राज्यांच्या सीमा लाभल्या आहेत. गुजरात राज्य पश्चिमोत्तर तर मध्य-प्रदेश राज्य जिल्ह्याचा पूर्वोत्तर सीमेवर आहे.जिल्ह्याच्या उत्तर भागात सातपुड्याची पर्वतरांग असून या पर्वतरांगामुळे नंदुरबार, मध्यप्रदेश व गुजरात राज्यापासून वेगळा झाला आहे. आदिवासींचा जिल्हा म्हणून ओळख असणाऱ्या नंदुरबारमध्ये २००१ च्या जनगणना अहवालानुसार ६५.५३% इतकी आदिवासी जनता असल्याचे नोंदवण्यात आले. नंदुरबार जिल्ह्यात नंदुरबार, धडगाव, अक्कलकुवा, तळोदा, शहादा, नवापुर असे एकूण ६ तालुके असून यात भिल्ल, पावरा, कोकणा, मावची, गावीत, गमित, तडवी इत्यादी प्रमुख आदिवासी जमातींचे वास्तव्य आहे.

प्रत्येक संस्कृतीमध्ये विशिष्ट अशा सांस्कृतिक परंपरा असतात. आणि त्याच परंपरांच्या माध्यमातून संस्कृतीचे अस्तित्व टिकून राहते. सर्वच समाजात सारख्या सांस्कृतिक परंपरा नसतात. सांस्कृतिक परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असतात. सांस्कृतिक परंपरांचा व्यक्तीच्या जीवनावर विशेष प्रभाव असतो. लोक आपल्या परंपरानुसार वर्तन करीत असतात. नंदुरबार जिल्यातील आदिवासी संस्कृती देखील त्याला अपवाद नाही. नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींनी कला, संगीत, सण-उत्सव, नृत्य, मौखिक साहित्य इत्यादींच्या माध्यमातून आपल्या सांस्कृतिक परंपरांचे जतन केले आहे. आदिवासींच्या सांस्कृतिक परंपरांच्या पाऊलखुणा या तिथे असणाऱ्या निसर्गातच आपल्याला पहावयास मिळतात. येथील सण-उत्सव साजरे करण्याची प्रेरणा देखील निसर्गातूनच घेतलेली दिसून येते. गुढ, अनाकलनीय परंतु जीवनात अत्यंत महत्वाची भूमिका असणाऱ्या निसर्गासमोर आदिवासी लोक नतमस्तक होऊन त्याची पूजा-प्रार्थना करतात. निसर्गातील वृक्ष-वेली, पक्षी-प्राणी, नद्या, डोंगर, हवा, पर्जन्य,चंद्र-सूर्य इत्यादींचे आपल्या दैनंदिन जीवनातील महत्व ओळखून त्यांना देव मानून प्रतिकात्मक रुपात त्यांची मनोभावे उपासना करणारी

परंपरागत संस्कृती आदिवासी जमातीमध्ये प्रचलित आहे. सभ्य समजली जाणारी संस्कृती निसर्गाशी संघर्ष करताना दिसते. तिथे आदिवासींनी मात्र निसर्गाशी समायोजित होऊन आपली संस्कृती विकसित केली आहे. अलीकडच्या काळात नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींच्या संस्कृतीतील सण-उत्सवांवर हिंदू, ख्रिचन, मुस्लिम या धर्मांचा प्रभाव पडताना दिसत आहे. परंतु अशाही परिस्थितीत खऱ्या अर्थाने निसर्गधर्माचे पालन करणाऱ्या आदिवासी समाजाने आपली निसर्गपूजक संस्कृती टिकवून ठेवली आहे. या संस्कृतीमध्ये असणारे बरेचसे सण-उत्सव हे निसर्गप्रेरित असल्यामुळे त्यांचा संशोधनात्मक अभ्यास करणे महत्वाचे आहे.

**उद्देश** -

- नंदुरबार जिल्ह्याची पार्श्वभूमी समजून घेणे.
- नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींच्या धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करणे.
- नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींच्या सण-उत्सवांचा अभ्यास करणे.
- नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींची संस्कृती व निसर्ग यांच्यातील सहसंबंध स्पष्ट करणे.

**गृहितके** -

१. नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी सण-उत्सव प्रिय आहेत.

२. नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींचे वस्तीस्थान निसर्गाच्या सानिध्यात आहे.

३. नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींची संस्कृती निसर्ग केंद्रित आहे.

४. नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी सण-उत्सवांच्या माध्यमातून निसर्गाच्या प्रती आपली कृतज्ञता व्यक्त करतात.

**संशोधन पद्धती** -

इतिहास विषय हे सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत येत असल्यामुळे विविध सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धतींचा उपयोग प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्त ठरतात. प्रस्तुत संशोधन विषय 'नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी जमातीचे निसर्गपूजक सण-उत्सव' हे असल्यामुळे या विषयावर संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक वर्णनात्मक व ग्रंथसूची संशोधन या समाजशास्त्रीय संशोधन पद्धतींचा अवलंब केला आहे. तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

**विषय विवेचन** -

नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी संस्कृती खास वैशिष्ट्यपूर्ण आहे. आदिवासींच्या रूढी-परंपरा, सण-उत्सव, धार्मिक कल्पना इत्यादी गोष्टी त्यांच्या सभोवतालच्या पर्यावरणाशी निगडीत अशा आहेत. निसर्गातील या विश्वात जसे सौंदर्य, मांगल्य, कोमलता, पावित्र्य आढळते तसेच भय, क्रोर्य, अनाकलनीय घटनाही आढळतात. त्या सर्वांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष ठसा आदिवासींच्या मानसिक जडणघडणीवर उमटत असतो व त्यातूनच सामाजिक चालीरिती, धार्मिक सण-उत्सव, यात्रा इ. सांस्कृतिक जीवनप्रहावर या नैसर्गिक घटनांचा प्रभाव पडणे अपरिहार्य आहे. मांगल्यापोटी किंवा भयापोटी सृष्टीतील सजीव-निर्जीव घटकांना आदिवासी मनोभावे पुजत आले आहेत. खऱ्या अर्थाने ते निसर्गपुत्र आहेत. येथील ऋतूबदला प्रमाणे सृष्टीतील होणारे बदल, बदलता हंगाम, वनस्पतींचे बदलणारे रंग, पक्षी-प्राणी यांचे निवासस्थान यांना अनुसरून सण-उत्सवांची क्रमबद्ध अशी सलग श्रृंखला आहे. या श्रृंखलेतील काही प्रमुख निसर्गपूजक सण-उत्सव खालीलप्रमाणे आहेत.

**१.नीलीचारी-**

पावसाळ्यात पहिल्या पावसानंतर जे नवीन गवत किंवा चारा उगवतो त्याचे पुजन केले जाते त्यास नीलीचारी असे म्हणतात. ज्या गवतामुळे आपल्या पशुना खाद्य मिळते त्या गवताची व त्याला जन्म देणाऱ्या धरणीमातेची पूजा करून कृतज्ञता व्यक्त केली जाते. एक विशिष्ट दिवस ठरवून सर्व गावकरी व पुजारी गावाच्या वेशीवर जाऊन गवताची पूजा करतात. यावेळी प्रत्येक घरातील शेतकरी नांगर हाकण्याची काठी (पाराणं), गुराख्यांची काठी सोबत घेऊन येतात. त्यांची देखील एकत्रित पूजा केली जाते. गवतपुजा झाल्याशिवाय गावातील कोणीही व्यक्ती हिरवा चारा किंवा भाजीपाला कापत नाहीत. निसर्गाच्या प्रती एवढी समर्पित भावना असणारा हा नीलीचारी हा सण नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी संस्कृतीचे खास वैशिष्ट्य आहे.

**२.वाघदेव** -

हा सण भिलोरी भाषेत वाघदेव व पावरी भाषेत बापदेव म्हणून ओळखला जातो. आदिवासींचे वास्तव्य हे प्रामुख्याने जंगलात असल्यामुळे जंगलाचा राजा असलेल्या वाघापासून स्वतःचे व आपल्या पाळीव प्राण्यांचे रक्षण करण्यासाठी वाघाला प्रसन्न करून त्याच्या पासून अभय मिळवण्यासाठी नंदुरबार जिल्यातील आदिवासी समाज वाघदेव हा सन साजरा करतात. हा सण साजरा करण्यासाठी गावातून वर्गणी जमा केली जाते व पुजाऱ्याला दिली जाते. त्या वर्गणीतून वाघाला बळी देण्यासाठी बकरा घेतला जातो. गावातील सर्व नागरिक पुजाऱ्यासह जंगलात जाऊन विधिवत हा सण साजरा करतात. यावेळी पुजारी वाघापासून सर्व प्राणिमात्रांचे रक्षण व्हावे यासाठी प्रार्थना करतो. सर्व विधी संपल्यानंतर एका व्यक्तीला वाघाचा वेष परिधान करून पळविण्यात येते. बाकीचे लोक त्याचावर चिखलाचे गोळे फेकून मारतात. वाघदेवाच्या निमित्ताने आदिवासी संस्कृतीतील वाघाबाद्दलची भीती आणि भक्ती यांचा सुरेख संगम पहावयास मिळतो.

**३. नवाय सण -**

नवाय म्हणजे नवीन होणे. शेतात अथक परिश्रम करून जे नवीन धान्यपिके, फळभाज्या परिपक्व होऊन काढण्याची वेळ येते त्यावेळी हा सण साजरा केला जातो. गावातील सर्व कुटुंब एकत्र येऊन नवीन धन्यापिकांची विधिवत पूजा करतात. अन्नदेवतेला प्रसन्न करून शेतातील धान्यपिक, फळभाजी यांची सदैव बरकत राहावी अशी त्यामागची श्रद्धा असते. नवीन अन्न शिजवल्यानंतर सर्वात आधी ते आपले इष्टदैवत व पूर्वजांना पळसाच्या पानावर नैवैद्य ठेवून अर्पण केले जाते. सर्व विधी पूर्ण झाल्याशिवाय कोणीही नवीन धान्य, फळभाजी खात नाही. नवीन भात खाण्याची सुरुवात या सणानंतरच केली जाते. काही भागात हा सण काकडा नवाय व खामारी नवाय या नावानेही साजरा केला जातो.

**४.गव्हाणपूजा** -

गव्हाण म्हणजे गोठ्यातील असे विशिष्ट स्थान, ज्याठीकाणी गायी-गुरांना खाण्यासाठी चारा एकत्रित ठेवला जातो. गव्हाणपूजा करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे गायी-गुरे, दुध-दुभते यांचे आरोग्य चांगले राहून त्यांची संख्या कायम वाढत रहावी यासाठी गव्हाण चाऱ्याने अखंड भरून रहावी. त्यामध्ये कधीही कमतरता पडू नये. आदिवासींसाठी गव्हाण म्हणजे गायी-गुरे, दुध-दुभते, अन्नधान्य यांची समृद्धीदेवता आहे. सातपुडा परिसरातील हि पूजा रात्रीच्या वेळी केली जाते. पूजाविधी संपल्यानंतर सर्व गावाला भंडारा दिला जातो.

**५.करहण मुवणे -**

सातपुड्याच्या परिसरातील आदिवासी समाजात विशेषतः हा सण साजरा केला जातो. ज्वारीचे कणीस परिपक्व झाल्यानंतर त्याची विधिवत पूजा केली जाते. व नंतर ज्वारीची भाकरी बनवून खाली जाते. करहण हि धन्यादेवता म्हणून ओळखली जाते. तिची आराधना केल्याने शेतात अन्नधान्याची भरभराट होते अशी श्रद्धा आहे. समृद्धीचे प्रतिक म्हणून धान्याची कणसे हातात असलेल्या या देवतेला आदिवासी समाजात कणसरी देवता असे म्हणतात.

**६.नागदेव-**

नंदुरबार जिल्यातील आदिवासी नाग-सर्पापासून आपल्या जीवाला धोका होऊ नये याकरिता नागदेवाला प्रसन्न करण्यासाठी त्याची पूजा करतात. आदिवासी लोक शेतात-जंगलात दिवस-रात्र काम करत असतात. त्यावेळी सर्पदंश करू नये म्हणून सर्पांचा राजा नाग्देवाची पूजा केली जाते. सापाला मारण्याऐवजी त्याची पूजा करून,त्याला प्रसन्न करून स्वतःचा आणि सापाचा जीव वाचवण्याचा संदेश देणारा हा पर्यावरणपूरक सण आदिवासी लोक आनंदाने साजरा करतात.

**निष्कर्ष-**

आदिम काळापासून समाजव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहापासून दूर जंगलात, दऱ्या-खोऱ्यात, डोंगरात वास्तव्य करून राहणारा आदिवासी समाज आजही मागास व दुर्लक्षित आहे. नंदुरबार जिल्यातील आदिवासींच्या अशिक्षित व भोळेपणाचा फायदा घेवून काही धार्मिक संघटनांनी आदिवासी संस्कृतीवर आपला प्रभाव पाडून सांस्कृतिक आक्रमण करण्याचा प्रयत्न चालविला आहे. परंतु या आक्रमणाला बळी न पडता येथील आदिवासींनी आपली आदिम संस्कृती आजही टिकवून ठेवली आहे. केवळ जंगलात राहतो म्हणून आदिवासींना वनवासी म्हणने चुकीचे ठरेल कारण जंगलाव्यातिरिक्त असणारी इतर सजीव व निर्जीव सृष्टी देखील आदिवासींच्या जीवनात महत्वाची आहे. आदिवासी संस्कृतीचा मूलाधार निसर्ग आहे. निसर्ग हा शक्तिमान असला तरी त्याच्याशी स्पर्धा न करता निसर्गनियमांचा उपयोग करून निसर्गाला नाराज न करता त्याला प्रसन्न ठेवून, त्याचा मान राखून उपयोग करून घेता येतो. निसर्गाशी स्पर्धा किंवा शत्रुत्व करून नव्हे तर निसर्गाशी सहकार्य करून जीवन जगणे या दृष्टीकोणातून निसर्गाचा प्रभाव आदिवासी संस्कृतीतील सण-उत्सवावर दिसून येतो. नीलीचारी, नवाय, कणसरीमाता इ. सणांच्या माध्यमातून वनस्पतीपूजा केली जात आहे. तर वाघासारख्या हिंस्त्र पशुला आणि नागासारख्या विषारी सर्पाला देखील आदिवासी संस्कृतीत देवत्व बहाल करून त्यांची पूजा केली जात आहे.

'जगा आणि जगू द्या' या शाश्वत विकासाच्या संकल्पनेला जगणारी आदिवासी संस्कृती निश्चितच अनुकरणीय आहे. आधुनिक, स्वयंकेंद्रि, वर्चस्ववादि व पर्यावरणाला मारक ठरणाऱ्या संस्कृतीपेक्षा पर्यावरणपूरक व समानतेचा पुरस्कार करणारी आदिवासी संस्कृती निश्चितच आदर्श अशी आहे.

**संदर्भ सूची-**

१) डॉ. प्रदीप आगलावे - आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, फेब्रुवारी, २०११

२) डॉ. गोविंद गारे - महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, २००२

३) डॉ. डी. आर. पाटील ( संपादक ) - भारतीय सण-उत्सवांचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्व, अथर्व प्रकाशन, जळगाव, २०१५

४) डॉ. धनाजी गुरव - आदिवासी साहित्य, वाड्मयसेवा प्रकाशन, नासिकरोड, ३१ डिसेंबर २००८

५) रमाकांत पाटील - नंदुरबार जिल्ह्याचे अंतरंग

६) गावीत पुष्पा - पश्चिम खान्देशातील आदिवासी लोकसाहित्य, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०११

७) रमाणिका गुप्ता - आदिवासी कौन, राधाकृष्ण प्रकाशन, नवी दिल्ली, २०१४

८) Https/www.marathisrushti.com/cities/

९) www.wikipedia.org/wiki/nandurbar.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com